आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

९ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- १९५० ते २०१५ या काळात भारतात बहुसंख्याकांची लोकसंख्या ७ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यांनी घटली असल्याचा प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचा अहवाल

- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातली अर्ज माघारीची मुदत संपली.

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान

- एअर इंडिया एक्सप्रेसच्या कर्मचारी आंदोलनामुळे ८५ उड्डाणं रद्द

- महिला क्रिकेटमधे, बांगलादेशाविरुद्धची टी- ट्वेंटी मालिका भारतानं ५-० अशी जिंकली

**आणि**

- तमिळनाडूत शिवकाशी इथं फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू तर १३ जण जखमी.

**<><><><><><>**

१९५० ते २०१५ या काळात भारतात बहुसंख्याकांची लोकसंख्या ७ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यांनी घटली असल्याचं प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार

समितीनं प्रसिद्ध केलेल्या कार्यपत्रिकेत म्हटलं आहे. १९५० मधे देशाच्या लोकसंख्येत हिंदूधर्मियांचं प्रमाण ८४ पूर्णांक ६८ शतांश टक्के होतं ते २०१५ मधे ७८ पूर्णांक ६ शतांश टक्क्यांवर आलं. या काळात अल्पसंख्याक समाजांची लोकसंख्या वाढली असल्याचंही या अहवालात म्हटलं आहे. मुस्लिम धर्मियांची लोकसंख्या ४३ पूर्णांक १५ शतांश टक्क्यांनी वाढली तर ख्रिस्ती धर्मियांची लोकसंख्या ५ पूर्णांक ३८ शतांश टक्क्यांनी वाढली असं आहवालात नमूद केलं आहे. जगातल्या १६७ देशांमधल्या अल्पसंख्याकांचा अभ्यास या कार्यपत्रिकेत करण्यात आला आहे. बांग्ला देश, पाकिस्तान, श्रीलंका, भूतान आणि अफगाणिस्तानात या काळात अल्पसंख्याकांची लोकसंख्या कमी झाली तर म्यानमा मधे ती सर्वात जास्त वाढली असं आढळलं आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशमधल्या मिळून ५८ मतदारसंघात या महिन्याच्या २५ तारखेला मतदान होईल. दिल्लीतल्या सर्व ७ जागा, हरियाणाच्या सर्व १० जागा, उत्तर प्रदेशच्या १४ जागा, बिहार आणि पश्चिम बंगालच्या प्रत्येकी ८ जागा, ओडिशाच्या ६ जागा, झारखंडच्या ४ आणि जम्मू-काश्मीरच्या एका जागेसाठी या टप्प्यात मतदान होणार आहे. झारखंड मधे ४ लोकसभा मतदारसंघांमधे मतदान होणार असून तिथे आता ९३ उमेदवार रिंगणात उरले आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या आणि त्यापुढच्या टप्प्यातला प्रचार आता तापला आहे. विविध पक्ष प्रतिपक्षांवर आरोप प्रत्यारोप करीत आहेत. तसंच विविध मतदारसंघात प्रचार करताना संबंधित भागातल्या अडचणी सोडवण्याची आश्वासनं देत आहेत.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तेलंगणात प्रचार करीत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याही आज तेलंगणात सभा झाल्या. महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्याच्या दुष्काळी भागासाठी पश्चिम वाहिनी कृष्णेचं वाहून जाणारं पाणी मराठवाड्यात वळवण्यासाठी 4 हजार कोटी रुपयांची कृष्णा फ्लड डायव्हर्जन योजना करण्यात येणार असल्याचं भाजपाचे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. त्यांनी अहमदनगर जिल्ह्यात आज दोन सभा घेतल्या. अंबानी अदानी यांच्याकडून काँग्रेसला पैसा मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विधान बेजबाबदारपणाचं असल्याची टीका, काँग्रेसनं केली आहे. या प्रकरणी या उद्योगपतींची चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेसनं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात केली आहे.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी राजकीय पक्ष आकाशवाणीवरुनही संदेश प्रसारित करीत आहेत. आकाशवाणी मुंबई केंद्रावरुन दुपारी ३ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या या राजकीय प्रसारणानंतर म्हणजे दुपारी ३ वाजून ४० मिनिटांनी प्रसारित होईल.

<><><><><><>

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण 'भिवंडी आणि कल्याण' लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत.

संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार ६२ अंकांनी घसरला आणि ७२ हजार ४०४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३४५ अंकांची घसरण नोंदवत २१ हजार ९५७ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कारांचं वितरण होत आहे. ज्येष्ठ अभिनेत्री वैजयंती माला, ज्येष्ठ अभिनेते चिरंजीवी यांचा राष्ट्रपतींनी पद्मविभूषण देऊन गौरव केला. दिवंगत न्यायमूर्ती फातिमा बीवी, मुंबई समाचार या वृत्तपत्राचे प्रकाशक होरमसजी कामा, जन्मभूमी वृत्तपत्राचे ज्येष्ठ पत्रकार कुंदन व्यास, ज्येष्ठ हृदयरोग तज्ञ अश्विन मेहता, दिवंगत अभिनेते कॅप्टन विजयकांत यांच्यासह ९ मान्यवरांना पद्मभूषण देऊन गौरवण्यात आलं. याशिवाय ५५ मान्यवरांचा पद्मश्री सन्मानानं राष्ट्रपतींनी गौरव केला. मल्लखांबचे ज्येष्ठ प्रशिक्षक उदय देशपांडे, ज्येष्ठ मेंदुविकार तज्ञ चंद्रशेखर मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर, कृषी क्षेत्रात कार्यरत संजय पाटील यांचा त्यात समावेश आहे.

या आधी २२ एप्रिलला राष्ट्रपतींनी तीन पद्मविभूषण, आठ पद्मभूषण तसंच ५५ जणांना पद्मश्री पुरस्कार प्रदान केले होते.

**<><><><><>**

पायाभूत विकासात उदयास येणाऱ्या नव्या तंत्रज्ञानाची चर्चा करण्याच्या उद्देशानं डी आर डी ओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या वतीनं दोन दिवसाच्या राष्ट्रीय परिसंवाद आणि उद्योग चर्चासत्राचं आजपासून नवी दिल्ली इथं आयोजन करण्यात आलं आहे. संरक्षण सचिव गिरीधर अरमाने यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या चर्चासत्रात डी आर डी ओ सह सैन्यदलं, शिक्षण तज्ज्ञ, औद्योगिक क्षेत्रातले मान्यवर सहभागी झाले आहेत. सीमावर्ती भागांत निर्माण होणाऱ्या भविष्यातल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आत्मनिर्भर बनण्याची आणि यासाठी खासगी क्षेत्राचं सहकार्य घेण्याची गरज संरक्षण सचिव गिरीधर अरमाने यांनी व्यक्त केली. यानिमित्तानं घेण्यात आलेल्या स्पर्धेत आय आय टी, एन आय टी तसंच विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांनी भाग घेतला.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर मधल्या पूंछ जिल्ह्यातल्या शाईस्तर भागांत ४ मे रोजी आय ए एफ अर्थात भारतीय हवाई दलाच्या ताफ्यावर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरु असलेल्या कोर्डन अँड सर्च ऑपरेशनचा आज सहावा दिवस आहे. या हल्ल्यात एका कॉर्पोरल रँक अधिकाऱ्याचा मृत्यू झाला होता. भारतीय सैन्यदल, पोलीस आणि केंद्रीय राखीव दल सुरनकोट भागातल्या सुमारे २० चौरस किलोमीटर क्षेत्रात शोधमोहीम राबवत आहेत. यातल्या मुख्य दोन दहशतवाद्यांची छायाचित्रं प्रसारित करण्यात आली असून त्यांची माहिती देणाऱ्याला २० लाख रुपये बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. आतापर्यंत २६ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे.

<><><><><>

सध्याच्या अस्थिर आणि अनिश्चिततेच्या वातावरणात शेजारी राष्ट्रांचे सलोख्याचे संबंध अधिक महत्त्वाचे असल्याचं मत , परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आज व्यक्त केलं. नवी दिल्ली इथं आज परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि मालदीवचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मुसा जमीर यांच्यात बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. उभय देशांतले परस्परसंबंध वृद्धिंगत करण्याच्या उद्देशानं आणि संवेदनशीलतेच्या भावनेतून भारत मालदीवच्या विकासात साहाय्यभूत होत आहे. शेजारी प्रथम धोरण आणि सागर उपक्रमांतर्गत मालदीवच्या जनतेच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी भारतानं मालदीवला पायाभूत सुविधा, सामाजिक उपक्रमांतून तसंच वैद्यकीय मदत देखील केली आहे. द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशानं या बैठकीत चर्चा झाली.

<><><><><>

एअर इंडिया एक्स्प्रेसनं कामावर न येणाऱ्या केबिन क्रू श्रेणीतल्या २५ वरिष्ठ कर्मचाऱ्यांना बडतर्फ केलं आहे. ७ मे रोजी हे कर्मचारी अचानक आजारपणाच्या सुटीवर गेले होते. त्यामुळं कंपनीला ८० हून अधिक उड्डाणं रद्द करावी लागली होती. आजही कंपनीनं ८५ उड्डाणं रद्द केली. एअर इंडियाच्या मदतीनं २० मार्गांवर एअर इंडिया एक्स्प्रेस २८३ उड्डाणं करत आहे. पण येत्या काही दिवसात काही उड्डाण रद्दं करावी लागतील, अशी शक्यता एअर इंडिया एक्सप्रेसचे मुख्य कार्यपालन अधिकारी आलोक सिंह यांनी दिली आहे.

<><><><><><>

आगामी योग दिनासाठी उलट गणनेच्या कार्यक्रमाचं आयोजन ईशान्य क्षेत्र विकास मंत्रालयातर्फे नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात आयोजित करण्यात आलं. ईशान्य क्षेत्र विकास मंत्रालयातले सचिव आणि अधिकारी हे योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सक्रियपणे सहभागी झाले होते.

**<><><><><>**

FIH हॉकी प्रो लीग स्पर्धेसाठी हॉकी इंडियानं २४ जणांच्या भारतीय संघांची आज घोषणा केली. हरमनप्रीत सिंह या संघाचा कर्णधार असून हार्दिक सिंह उपकर्णधार आणि श्रीजेश रवींद्रन गोलकीपर आहे. पहिल्या टप्प्यात बेल्जियममध्ये २२ मे ते ३० मे दरम्यान ही स्पर्धा होईल. दुसऱ्या टप्प्यात इंग्लंडमध्ये १ जून ते १२ जून दरम्यान स्पर्धा सामने होतील. ८ सामन्यांमधून १५ गुण मिळवून भारतीय संघ गुणपत्रिकेत तिसऱ्या स्थानी आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेट मधे, बांगलादेशाविरुद्धची टी- ट्वेंटी मालिका भारतानं ५-० अशी जिंकली आहे.  आज बांगलादेशात सिल्हट इथं झालेल्या पाचव्या सामन्यात भारतानं ३१ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकात, ५ गडी गमावून १५६ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना बांगलादेशाला २० षटकात ६ गडी गमावून १३५ धावाच करता आल्या. भारतातर्फे राधा यादवनं ३, तर आशा शोभनानं २ बळी घेतले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज धर्मशाला इथं पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या ७ षटकात २ बाद ७२ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**